27

# वाचनसाहित्य निर्मिती एक अभ्यास

**डॉ. विलास अशोकराव काळे**

**प्रस्तावणा**: ग्रंथ हे प्रथम त्यातील प्रतिपादित विषयाकरता वाचले जातात. त्याच बरोबर लेखका करीता वाचले जातात. हा ग्रंथालयशास्त्रातील प्राथमिक धडा आहे. यासाठीच ग्रंथालयात विषयाधारित वर्गीकरण आणि तालिकीकरण या दोन तंत्रांचा उगम झाला. पुढे ग्रंथ या संज्ञांची व्याप्ती वाढून ग्रंथातील प्रकरण नियतकालीकांतील लेख, छोटया पुस्तिका, अहवाल, एखादे छापील भाषण, संशोधकांचे लेख इत्यादींना ग्रंथाइतका दर्जा अभ्यासक देऊ लागले. यातुन ग्रंथपालाची भूमिका मोठया प्रमाणात वाढत गेली. आजचा ग्रंथपाल हा केवळ देवाण–घेवाणी पूरता मर्यादीत न राहता संशोधक वृत्ती अंगीकारणारा बनला आहे. आपले ज्ञान व नवीन संशोधन हे जास्तीत जास्त वाचकांपुढे मांडण्यासाठी त्याने लिखान वृत्ती अंगीकार करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर ग्रंथपालाच्या बौध्दीक अनुभवाचा उपयोग समाजाला जास्तीत जास्त होण्यासाठी त्यांनी अभ्यासेत्तर उपक्रमात सहभागी होणे आवश्यक आहे.

०१. **युजीसी —** विद्यापीठ अनुदान आयोग ही उच्च शिक्षणातील शिखर संस्था, १९५६ मध्ये The University Grant Commission Act. 1956 च्या कायद्यानुसार भारत सरकारद्वारे कायदेशीर दर्जा प्राप्त झालेल्या या संस्थेचे भारतातील उच्च शिक्षणाच्या विकासात भरीव योगदान दिलेले आहे. माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) च्या प्रगतीमूळे प्रत्येक क्षेत्रात गुणात्मक व दर्जात्मक वाढ होताना आढळून येत आहे. देशाच्या प्रगतीचा कणा मानण्यात येणारे शिक्षण क्षेत्र यात मागे राहू नये, या दृष्टीने विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षणाचा शिक्षकांकरिता F-3-1/2009 दिनांक ३० जून २०१० या क्रमांकाच्या रेग्युलेशनद्वारे Performance Appraisal System विकसित केली आहे. शिक्षण संवर्गात येणाऱ्या विविध पदांकरिता Academic Performance Indicator (API) विकसित करताना या रेग्युलेशनमधील Appendix III अंतर्गत तक्ता क्र. VII ते IX हे महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथपालां करिता तयार केले आहेत. यामध्ये शिक्षकांप्रमाणेच एकंदर तीन स्तरांवर आपली योग्यता सिध्द करावी लागेल. या तीन स्तरांवर पूर्ण करावयाच्या जबाबदाऱ्या खाली नमूद केलेल्या शिर्षकांतर्गत देण्यात आलेल्या आहेत.

**घटक ०१ :** *Procurement , Organization and Delivery of Knowledge and Information through Library Service*

**घटक ०२:** *Co-curricular, Extension and Professional Development Related Activities .*

**घटक ०३:** *Research and Academic Contributions .*

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नजरेत शैक्षणिक क्षेत्रातील ग्रंथपाल निव्वळ ग्रंथांचा किंवा ग्रंथालयाचा रक्षणकर्ता नाही ही बाब सर्वप्रथम स्पष्ट करणे गरजेचे आहे. महाविद्यालयात किंवा विद्यापीठाच्या विकासात आपले भरीव योगदान देताना ग्रंथपालास माहिती व्यवस्थापन, प्रशासक, शिक्षक, संशोधक, इत्यादी अनेक भूमिका एकाच वेळेस पार पाडाव्या लागणार आहेत. तथापि, वर्षभरात या विविधांगी भूमिका पार पाडताना केलेल्या कामाचे मूल्यमापन वर्षाच्या अखेरीस होणार असल्यामूळे आपण केलेले कार्य उत्कृष्ट कसे राहील याची काळजी घेताना ग्रंथपालांना आपण केलेल्या कामांच्या व्यवस्थित नोंदी ठेवाव्या लागणार आहेत. **(खेरडे, मोहन,२०११–२०१२)**

**प्रकाशन साहित्य (वाचनसाहित्य)**

प्रकाशन साहित्य म्हणजे हाताळण्यास सुलभ, स्थलांतरास योग्य व दीर्घकाळ परिरक्षणम अशी कागदावरील किंवा अन्य सामग्रीवरील अभिलिखित कृती होय.

प्रकाशन साहित्यात माहिती व ज्ञान जतन केलेले असते. म्हणजे वाचन साहित्य ही एक माहिती देणारी वस्तु आहे. ग्रंथ व ग्रंथेत्तर साहित्याला प्रकाशन साहित्य (वाचनसाहित्य) म्हणतात.

शैक्षणिक रिफारर्मींग मध्ये ‘विज्ञान प्रकाशित एक ग्रंथपाल दृष्टीकोन’ या आपल्या लेखात संशोधन ग्रंथालयातील ग्रंथपालाचे महाविद्यालयात व विद्यापीठातील कार्ये मोठया प्रमाणात बदल करणे आवश्यक आहे. या साठी विद्यवत्तापूर्ण प्रकाशने शोधणे व निर्मिती करणे हे संशोधक ग्रंथपालाचे कर्तव्य आहे. शैक्षणिक प्रकरनातील निर्मिती होणाऱ्या संकटांची चर्चा या लेखात केली आहे. विशेषत: विज्ञान शाखेतील वाढीव किंमती मुळे योणाऱ्या मार्यादावर मात करून जास्तीत जास्त संशोधन विद्यार्थ्यांच्या समोर आणावे. *(www.ams.org)*

## ०३. संशोधनाची गृहीतके

०१. महाविद्यालयातील ग्रंथपाल हे ग्रंथालय कामकाजा बरोबरच स्वत:च्या प्रकाशन सहभागी होतात.
०२. शहरी विभागातील महाविद्यालयीन ग्रंथपालाचे योगदान हे ग्रामीण भागातील महाविद्यालयीन ग्रंथापलां पेक्षा आधिक आहे.
०३. वाढत्या अनुभवातून जास्त प्रकाशन साहित्यांची निर्मिती.

## ०४. व्याप्ती व मर्यादा

संशोधनासाठी स्वामी रामानंदतिर्थ मराठवाडा विद्यापीठा नांदेड अंतर्गत असलेल्या नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली जिल्हामधील अनुदानित महाविद्यालया पुरता आहे. त्यांच बरोबर संशोधन कार्यात विद्यापीठा अंतर्गत असलेल्या कला–वाणिज्य–विज्ञान महाविद्यालय, अध्यापक महाविद्यालय, शरिरीकशिक्षण महाविद्यालय, व विधि महाविद्यालयांचा यात सामावेश होतो. महाविद्यालयीन ग्रंथपालांच्या प्रकाशनयोगदान अभ्यास या संशोधन कार्यात करण्यात आला आहे.

०५. माहिती संकलन –

## अ. सामान्य माहिती–

### ५.१. स्वामी रामानंदतिर्थ मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत महाविद्यालय

प्रस्तूत संशोधनात औरंगाबाद विद्यापीठ नांदेड अंतर्गत असलेल्या महाविद्यालयांचा, ग्रंथपाल संख्या, विभाग वार महाविद्यालय आणि ग्रंथपाल संख्या, स्त्री/पुरूष प्रमाण, महाविद्यालयीन ग्रंथपालांच्या प्रश्नावलीतील प्रतिसाद, शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक अनुभव इ. बाबीचा या घटकात समावेश करण्यात आला आहे.

- स्वा.रा.ती.म.वि. नांदेड . **अंतर्गत जिल्हा निहाय अनुदानित महाविद्यालय** :

संशोधनासाठी निवडलेल्या महाविद्यालयांची जिल्हा निहाय विभागणी केली आहे. त्यानुसार सारणी क्रमाक ५.१ दर्शविण्यात आली आहे.

**सारणी क्र ५.१**

स्वा.रा.ती.म.वि. नांदेड . **अंतर्गत जिल्हा निहाय अनुदानित महाविद्यालय**

| अनु. क्र. | जिल्हानिहाय | तालुका निहाय संख्या | एकुण महाविद्यालय संख्या | संशोधनासाठी निवडलेले महाविद्यालय संख्या | संशोधन निवड शेकडा प्रमाण एकूण अनुदानित प्रमाणानुसार |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | नांदेड | १६ | ६८ | ३७ | २१.७६ % |
| ०२ | लातूर | १० | ४८ | ३३ | १९.४१ % |
| ०३ | परभणी | ०९ | ३८ | २० | ११.७६ % |
| ०४ | हिंगोली | ०५ | १६ | ०८ | ४.७० % |
| | **एकूण** | ४० | १७० | ९८ | ५७.६४ % |

**विश्लेषण** :

सारणी क्र. ५.१ एस.आर.टी. एम. यु नांदेड संलग्नीत निवडलेल्या १७० महाविद्यालयाचे विश्लेषण करताना असे स्पष्ट होते की, विद्यापीठ संलग्नीत चार जिल्ह्यामध्ये एकूण ४० तालूक्यांचा समावेश होतो. यात ९८ अनुदानित महाविद्यालय आहेत. एकूण अनुदानित महाविद्यालयांच्या शेकडा प्रमाण ५७.६४ % महाविद्यालय संशोधकाने संशोधनासाठी निवडण्यात आले आहेत.

### ५.२. प्रश्नावलीस प्रतिसाद

स्वा.रा.ती.म.वि. नांदेड अंतर्गत व संशोधनासाठी निवडलेल्या महाविद्यालयीन ग्रंथपालांचा प्रश्नावलीला मिळालेला प्रतिसाद हा सारणी क्र. ५.२ मध्ये मध्ये दर्शविला आहे.

**सारणी क्र. ५.२**
**प्रश्नावलीस प्रतिसाद**

| अनु क्र. | जिल्हानिहाय | संशोधनासाठी निवडलेले महाविद्यालय संख्या | प्रश्नावली प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | नांदेड | ३७ | ३० | ३०.६१ % |
| ०२ | लातूर | ३३ | ३१ | ३१.६३ % |
| ०३ | परभणी | २० | १९ | १९.३८% |
| ०४ | हिंगोली | ०८ | ०८ | ८.१६% |
| | **एकूण** | ९८ | ८८ | ८९.७९ % |

**विश्लेषण :**

सारणी क्र ५.१.२ मध्ये ९८ महाविद्यालयीन ग्रंथपालाना प्रश्नावली देण्यात आली त्यापैकी ८८ महाविद्यालयीन ग्रंथपालांनी प्रश्नावली भरून दिली आहे. ज्याचे प्रमाण एकूण निवडलेल्या महाविद्यालयापैकी शेकडा प्रमाण ८९.७९% इतके आहे.

प्रतिसाद दिलेल्या जिल्हा निहाय प्रमाणामध्ये नांदेड जिल्ह्यांचे ३० (३०.६१% ) महाविद्यालयीन ग्रंथपाल, लातूर जिल्ह्यातील ३१ ( ३१.६३%) महाविद्यालय ग्रंथपाल, परभणी जिल्ह्यातील १९ (१९.३८%) महाविद्यालय ग्रंथपाल, हिंगोली जिल्ह्यामध्ये ०८ (०८.१६% ) महाविद्यालय ग्रंथपालांचा यात समावेश होतो.

## *०६ – ग्रंथपालांचे प्रकाशनातील योगदान*

### ६.१. प्रकाशनातील (वाचनसाहित्य) योगदान

प्रकाशनातील योगदान या उप–विभागमध्ये महाविद्यालयीन ग्रंथपालांचे ग्रंथलिखान, नियतकालिकेतील लेख, सेमिनार, कॉन्फरन्स मधिल लेख, वर्तमानपत्रातील लेख, महाविद्यालयीन ग्रंथस्मरणीकेतील लेख इत्यादी प्रकाशनातील योगदानांची संकलित माहिती पुढील प्रमाणे नमुद केली आहे.

### ६.१. ग्रंथपालांची लेखन कृती सहभाग

प्रतिसाद मिळालेल्या ग्रंथपाला मध्ये लेखन कृती बद्दल असलेला प्रतिसाद सारणी क्र. ५.१ मध्ये जिल्हा निहाय दर्शविला आहे.

ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

**सारणी क्र. ६.१**
**ग्रंथ लिखान करणारे**

| अनु. क्र. | जिल्हानिहाय | प्रतीसाद संख्या | एकूण | ग्रंथसख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | नांदेड | ३० | ०२ | ०६ | ६.६६ % |
| ०२ | लातूर | ३१ | ०२ | ०३ | ९.६७% |
| ०३ | परभणी | १९ | ०३ | ०९ | १५.७८% |
| ०४ | हिंगोली | ०८ | ०० | ०० | ००% |
| | **एकूण** | ८८ | ०७ | १८ | ७.९५% |

**विश्लेषण :**

सारणी क्र. ६.१ मध्ये प्रतिसाद दिलेल्या महाविद्यालयीन ग्रंथपालांचे ग्रंथ लिखाना मध्ये सहभागाचे स्पष्टीकरण केले आहे. यात महाविद्यालयीन ग्रंथपालांपैकी लेखन कृती करणारे ग्रंथपालांची संख्या ही ०७ असून यांचे शेकडा प्रमाण ०७.९५ % आहे. **महाविद्यालयातील ग्रंथपाल हे ग्रंथालय कामकाजा बरोबरच स्वत:च्या प्रकाशनात सहभाग घेतात. (गृहीत क्र. ०१) हे विधान स्विकारण्यात येत आहे.**

**०६.२ नियतकालिकेतील लेखात योगदान**

स्वा.रा.ती.म.वि. नांदेड अंतर्गत असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथपालांचा नियतकालिकातून लेखन करणारे ग्रंथपालांचे योगदान सारणी क्र. ६.२. मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्र. ५.२.३**
**नियतकालिकेतून लेखन करणारे ग्रंथापाल**

| अनु क्र. | जिल्हानिहाय | प्रश्नावली प्रतिसाद संख्या | नियतकालिकेत लेख लिहीणारे ग्रंथपाल संख्या | नियतकालिकेचा प्रकाशनाचा स्तर व लेखाची संख्या | | | नियतकालिकात लेख लिहिणाऱ्या एकूण ग्रंथपालांची शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आंतरराष्ट्रीय | राष्ट्रीय | राज्य | |
| ०१ | नांदेड | ३० | २८ | १५ | ३० | १८ | ४०ण५७: |
| ०२ | लातूर | ३१ | २० | १२ | २२ | ०४ | २८ण९८: |
| ०३ | परभणी | १९ | ०९ | १८ | ३८ | ५८ | १३ण०४: |
| ०४ | हिंगोली | ०८ | ०४ | ०५ | ०९ | १२ | ५ण७९: |
| | **एकूण** | ८८ | ६१ | ५० | ९९ | ९२ | ८८ण४०: |

**विश्लेषण :**

सारणी क्र. ६.२. मध्ये महाविद्यालयीन ग्रंथपालांनी नियतकालिकातून लेखन करणारे ग्रंथपालांचे योगदान या सारणीत स्पष्ट होते यात जिल्हा निहाय वर्गिकरणात नियतकालिकेत लेखनात योगदान करणाऱ्या शहरी व ग्रामीण विभागावर विभागणी करण्यात आली आहे. प्रतिसाद दिलेल्या ८८ ग्रंथपालांपैकी ६१ ग्रंथपालांनी नियतकालिकेत लेख लिहीण्यास प्रतिसाद देणारे ग्रंथपाल आहेत. ज्यांचे एकूण प्रतिसाद ग्रंथपालांच्या शेकडा ८८.४० % प्रमाण आहे. **महाविद्यालयातील ग्रंथपाल हे ग्रंथालय कामकाजा बरोबरच स्वत:च्या प्रकाशनात सहभाग घेतात. (गृहीत क्र. ०१) हे विधान स्विकारण्यात येत आहे.**

### ६.३. कॉन्फरन्स/सेमिनार मध्ये योगदान –

स्वा.रा.ती.म.वि. नांदेड अंतर्गत असणाऱ्या ग्रंथपालांच्या कॉन्फरन्स/सेमिनार या मध्ये लेखन करणाऱ्याय ग्रंथपालांचे लेख संख्या सारणी क्र. ६.३. पुढील प्रमाणे दर्शविण्यात आली आहे.

**सारणी क्र. ६.३.**

**कॉन्फरन्स/सेमिनार मध्ये लेखांचे सादरीकरण करणारे ग्रंथपाल**

| अनु क्र. | जिल्हानिहाय | प्रश्नावली प्रतिसाद संख्या | एकूण कॉन्फरन्स/सेमिनार मध्ये ग्रं. संख्या | कॉन्फरन्स/सेमिनार मध्य स्तर व लेखाची संख्या | | | | नियतकालिकात लेख लिहिणाऱ्या एकूण ग्रंथपालांची शेकडा पमाण. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आंतरराष्ट्रीय | राष्ट्रीय | राज्य | स्थानिक | |
| ०१ | नांदेड | ३० | २८ | ४२ | ९१ | १०३ | ०६ | ४०.५७ |
| ०२ | लातूर | ३१ | २३ | ३२ | ७३ | ८४ | ०२ | ३३.३३ |
| ०३ | परभणी | १९ | १४ | १८ | ३७ | ५८ | ०५ | २०.२८ |
| ०४ | हिंगोली | ०८ | ०४ | ११ | ०९ | २१ | ०२ | ५.७९ |
| | **एकूण** | **८८** | **६९** | **१०३** | **२१०** | **२६६** | **१५** | |

**विश्लेषण :**

सारणी क्र. ६.३. मध्ये जिल्हा निहाय कॉन्फरन्स/सेमिनार मध्ये लेखांचे सादरीकरण करणारे ग्रंथपाल यांचे योगदान स्पष्ट केले आहे. यात प्रतिसाद दिलेल्या ८८ ग्रंथपालाच्या जिल्हा निहाय विभागणी मध्ये ग्रंथपालांनी कॉन्फरन्स/सेमिनार या मध्ये लेखन काम केले आहे. कॉन्फरन्स/सेमिनार मध्ये लेख लिहिणाऱ्या एकूण ग्रंथपालांची शेकडा ८७.२०% प्रमाण आहे. **महाविद्यालयातील ग्रंथपाल हे ग्रंथालय कामकाजा बरोबरच स्वत:च्या प्रकाशनात सहभाग घेतात. (गृहीत क्र. ०१) हे विधान स्विकारण्यात येत आहे**

### ६.४. वर्तमानपत्रात लेखनाचे योगदान

स्वा.रा.ती.म.वि. नांदेड अंतर्गत असणाऱ्या ग्रंथपालांचा वर्तमानपत्रात लेख लेखन करणाऱ्या ग्रंथपालांचे लेख संख्या सारणी क्र. ६.४. पुढील प्रमाणे दर्शविण्यात आली आहे.

**सारणी क्र. ६.४.**

**वर्तमानपत्र लेखनात योगदान**

| अनु क्र. | जिल्हानिहाय | प्रश्नावली प्रतिसाद संख्या | वर्तमानपत्र लेख संख्या | एकूण शे.प्र. |
|---|---|---|---|---|
| ०१ | नांदेड | ३० | २४ | २३.६७% |
| ०२ | लातूर | ३१ | १९ | १६.४२% |
| ०३ | परभणी | १९ | ०५ | ६.१३% |
| ०४ | हिंगोली | ०८ | ०२ | १.७८% |
| | **एकूण** | ८८ | ५० | ६१.३५% |

**विश्लेषण :**

सारणी क्र. ६.४. मध्ये वर्तमान पत्रातून लेख लिहिणाऱ्या ग्रंथपालांचे विश्लेषण करण्यात आले आहे. यात स्वा.रा.ती.म.वि. नांदेड अंतर्गत असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथपालांचे वर्तमानपत्रात लेखनातील योगदाना मध्ये ८८ प्रतिसाद ग्रंथपालांपैकी ५० ग्रंथपाल (७२.४६%) यामध्ये सहभागी आहेत. **महाविद्यालयातील ग्रंथपाल हे ग्रंथालय कामकाजा बरोबरच स्वत:च्या प्रकाशनात सहभाग घेतात. (गृहीत क्र. ०१) हे विधान स्विकारण्यात येत आहे.** या मध्ये ०९ (१०.४६%) ग्रंथपाल शहरी विभागातील, ०६ (०६.९७%) ग्रामीण विभागातील ग्रंथपाल आहेत. या ग्रंथपालांनी ३३ विविध वर्तमानपत्रातून लेखन कार्य केले आहेत. **शहरी विभागातील महाविद्यालयीन ग्रंथपालांचे योगदान हे ग्रामीण भागातील महाविद्यालयीन ग्रंथपालापेक्षा अधिक आहे. (गृहितक क्र. ०२) विधान स्विकारण्यात येत आहे.**

**६.५. महाविद्यालयीन स्मरणिकेत लिखाणात योगदान.**

स्वा.रा.ती.म.वि. नांदेड अंतर्गत असणाऱ्या ग्रंथपालांचा स्मरणिकेतील लेखामध्ये योगदानाचे विश्लेषन सारणी क्र. ६.५.६ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**सारणी क्र. ६.५.६**
**स्मरणिकेत लेखन करणाऱ्या ग्रंथपालांची संख्या**

| अनु.क्र. | जिल्हानिहाय | प्रश्नावली प्रतिसाद संख्या | एकूण स्मरणिकेतून लेख लिहाणारे ग्रं.संख्या | एकूण शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | औरंगाबाद | ३० | २० | २८.९८% |
| ०२ | जालना | ३१ | १७ | २४.६३% |
| ०३ | बीड | १९ | ०९ | १३.०४% |
| ०४ | उस्मानाबाद | ०८ | ०४ | ५.७९% |
| | **एकूण** | ८८ | ५० | ७२.४६% |

**विश्लेषण :**

सारणी क्र. ६.५. मध्ये स्वा.रा.ती.म.वि. नांदेड अंतर्गत असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथपालांनी ग्रंथ स्मरणिकेतील योगदानांची विश्लेषण करण्यात आले आहे. यात प्रतिसाद दिलेल्या ८८ ग्रंथपालांपैकी ५० (७२.७६%) ग्रंथपालांनी ग्रंथ स्मरणिकेतून लेख लिहिले आहेत. **महाविद्यालयातील ग्रंथपाल हे ग्रंथालय कामकाजा बरोबरच स्वत:च्या प्रकाशनात सहभाग घेतात. (गृहीत क्र. ०१) हे विधान स्विकारण्यात येत आहे.**

**निर्षकश –**

**०१.जिल्हा निहाय अनुदानित महाविद्यालय संख्या**

स्वा.रा.ती.म.वि. नांदेड अंतर्गत चार जिल्ह्यामध्ये १७० महाविद्यालयांची संख्या आहे. त्यापैकी १२३ (३०.४४ %) इतके अनुदानित महाविद्यालय आहेत. (सारणी क्र.३.२.१)

### ०२. ग्रंथ लेखन योगदान

महाविद्यालयीन ग्रंथपालांपैकी लेखन कृती करणारे ग्रंथपालांची संख्या ही ०७ असून यांचे शेकडा प्रमाण ०७.९५ % आहे. (सारणी क्र. ५.२.२) **महाविद्यालयातील ग्रंथपाल हे ग्रंथालय कामकाजा बरोबरच स्वत:च्या प्रकाशनात सहभाग घेतात. (गृहीत क्र. ०१) हे विधान स्विकारण्यात येत आहे.**

### ०३. नियतकालिकेत योगदान

प्रतिसाद दिलेल्या ८८ ग्रंथपालांपैकी ६१ ग्रंथपालांनी नियतकालिकेत लेख लिहीण्यास प्रतिसाद देणारे ग्रंथपाल आहेत. **महाविद्यालयातील ग्रंथपाल हे ग्रंथालय कामकाजा बरोबरच स्वत:च्या प्रकाशनात सहभाग घेतात. (गृहीत क्र. ०१) हे विधान स्विकारण्यात येत आहे.** (आलेख क्र. ५.९)

### ०३. कॉन्फरन्स/सेमिनार मधील योगदान

प्रतिसाद दिलेल्या ८८ ग्रंथपालाच्या जिल्हा निहाय विभागणी मध्ये ग्रंथपालांनी कॉन्फरन्स/सेमिनार या मध्ये लेखन काम केले आहे. कॉन्फरन्स/सेमिनार मध्ये लेख लिहिणाऱ्या एकूण ग्रंथपालांची शेकडा ८७.२०% प्रमाण आहे.**महाविद्यालयातील ग्रंथपाल हे ग्रंथालय कामकाजा बरोबरच स्वत:च्या प्रकाशनात सहभाग होतात. (गृहीत क्र. ०१) हे विधान स्विकारण्यात येत आहे.** (आलेख क्र. ५.११)

### ०४. वर्तमानपत्रात लेखनाचे योगदान

वर्तमानपत्रात लेखनातील योगदाना मध्ये ८८ प्रतिसाद ग्रंथपालांपैकी ५० ग्रंथपाल (७२.४६%) यामध्ये सहभागी आहेत. **महाविद्यालयातील ग्रंथपाल हे ग्रंथालय कामकाजा बरोबरच स्वत:च्या प्रकाशनात सहभाग घेतात. (गृहीत क्र. ०१) हे विधान स्विकारण्यात येत आहे.** (आलेख क्र. ५.१३)

### ०५. स्मरणिकेत लेखनात योगदान.

यात प्रतिसाद दिलेल्या ८८ ग्रंथपालांपैकी ५० (७२.७६%) ग्रंथपालांनी ग्रंथ स्मरणिकेतून लेख लिहिले आहेत. (सारणी क्र. ५.२.६) **शहरी विभागातील महाविद्यालयीन ग्रंथपालाचे योगदान हे ग्रामीण भागातील महाविद्यालयीन ग्रंथपालांपेक्षा अधिक आहे. (गृहितक क्र. ०२) विधान स्विकारण्यात येत नाही.** (आलेख क्र. ५.१५)

- **समारोप** : विद्यापीठ अनुदान आयोगांनी महाविद्यालयीन शिक्षक कार्मचाऱ्यांना स्वत:च्या शैक्षणीक कालावधीतील योगदानांची नोंद ठेवावी लागते. यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने API (Academic Perfomanc Indicators) नोंद तपशील तयार करणे हे विद्यापीठ /महाविद्यालयीन स्तरावरील महाविद्यालयीन शिक्षकांना बधंनकारक करण्यात

आले आहे. यामध्ये महाविद्यालयीन ग्रंथपालांना देखील एपीआय स्कोर तयार करावा लागतो. यामध्ये ग्रंथपालांच्या व्यावसायिकते बरोबरच त्यांची अभीरूची व अभीवृत्तीचा उपयोग समाजाला जास्तीत जास्त होणे अपेक्षीत आहे. त्यांच बरोबर ग्रंथपालाचा दर्जा सुधारण्यासाठी या उपक्रमांचा निश्चित उपयोग होईल. या संशोधनातील निष्कर्षांचा, शिफारशींचा आणि भविष्य वेधाचा ग्रंथपालाबरोबरच या क्षेत्रात संशोधन कार्य इच्छिणाऱ्या संशोधकांना, अभ्यासकांना उपयोग होणार आहे.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्राबरोबरच विशेष ग्रंथालयासाठी या संशोधनाचा निश्चित उपयोग होणार आहे. ग्रंथपालांना आपल्या स्वत:ची व्यावसायिकतेत आणखी सुधारणा होण्यासाठी निश्चितच उपयुक्त होणार आहे.

## • संदर्भ सूची


- Abt. Helmut, A. (2007) *The publication rate of scientific, papers depends only on the number of scientists. Scientometrics.* 73 (3) 281-288.
- Adhe G.D.(2008).*Productivity patterns of scientists in marathwada: a bibliometric study*, Ph.D thesis, Dr, Babasaheb Ambedkar Marathwada University Aurgangabd.
- देशमुख राहुल के. आणि वीर धर्मराज के. (२०१७), **महाविद्यालयीत ग्रंथपालांचा प्रकाशनातील योगदान,** Institute of English Language, Literature & Research, Jalgaon Cofference , मार्च ७–८,
- देशमुख राहुल के. आणि ताकसांडे. (२०१७), वाचन साहित्य निर्मितीत स्त्री ग्रंथपालांचे योगदान–एक अभ्यास, कै. काशीरामजी शिंदे महाविद्याल, परभणी, कॉन्फरन्स, ०९ मार्च २०१७
- देशमुख राहुल के. आणि ताकसांडे. (२०१४), महाविद्यालयीन ग्रंथपालांचा सामाजिक दर्जा, ग्रंथपरिवार, ०९ जोनवारी


❑❑❑